स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/शै.वि./बारामती रोजगार मेळावा/२०२४/ 896 दिनांक : 22 FEB 2024

**परिपत्रक:**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त
**पुणे विभागातील सर्व संस्था**

**विषय : दिनांक ०२ मार्च, २०२४ रोजी बारामती (पुणे) येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याबाबत.**

संदर्भ : १) शासन निर्णय कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग क्र. कौविउ-२०२४/प्र.क्र.१४/प्रशा-२, दिनांक ०६.०२.२०२४.
२) मा.विभागीय आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय, येरवडा, पुणे-६ यांचे पत्र क्र. कौविरोवउ/विकापु/बारामती/रोमे/५१४/२०२४, दि. २१.०२.२०२४.
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D170TEQP/39/2024-DESK17 दि. २२.०२.२०२४.

शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी संदर्भ क्रमांक १ मधील दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय नमो महारोजगार मेळावे आयोजित करण्याबाबतचे निर्देश देण्यांत आलेले आहेत.

त्याअनुषंगाने दिनांक २०.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार, राज्यातील जास्तीत जास्त उमेदवारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता तसेच उद्योजकांना आवश्यक कुशल मनुष्यबळ प्राप्त होण्यासाठी नामांकित उद्योजक/इंडस्ट्रिज यांचे समवेत **शनिवार दिनांक ०२ मार्च, २०२४ रोजी विद्या प्रतिष्ठानचे कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, बारामती, ता. बारामती, जि. पुणे येथे विभागस्तरीय विशेष नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यांत आले असलेबाबत** कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभागीय आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्रमांक २ मधील पत्रान्वये कळविले आहे.

या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमधील विद्यार्थ्यांना सदरच्या महारोजगार मेळाव्याचा त्यांच्या उज्वल भविष्याकरिता व्हावा यादृष्टीने आपणांस खालीलप्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१. आपल्या संस्थेत शिक्षण शिक्षण घेत असलेले अथवा शिक्षण सोडलेले अथवा पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना सदर मेळाव्यात सहभागी होण्याच्या सूचना द्याव्यात तसेच यादृष्टीने प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी.

२. जास्तीत जास्त नोकरीइच्छुक उमेदवारांची नोंदणी महास्वयम या वेबपोर्टलवर (https://rojgar.mahaswayam.gov.in) करुन घेण्यात यावी.
३. आपल्या संस्थेतील प्लेसमेंट कक्षाने याबाबतची माहिती विद्यार्थ्यांस देऊन सदरच्या मेळाव्यास सहभागी व्हावे.
४. उमेदवारांना कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, करियर मार्गदर्शन इ. विषयांबाबत समुपदेशन व मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशक उपलब्ध करुन द्यावा.
५. तसेच, आपल्या संस्थेतील उमेदवारांना सदर महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित राहण्याकरिता संस्थेच्या बसेस उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत :
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्र. १७) यांना माहितीस्तव.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना - सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.